आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक २० डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

- परभणीतील हिंसाचार हिंदू विरुद्ध दलित अशी दंगल नसल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांचं विधानसभेत स्पष्टीकरण; विशेष तपास समिती स्थापन करण्याची घोषणा.
- लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात भाजप फेक नॅरेटिव्ह पसरवत असल्याचा नाना पटोले यांचा आरोप.
- एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव; संसदेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब.
- आणिबायो बिट्टूमेन या जैविक रसायनावर आधारित भारतातील पहिल्या राष्ट्रीय महामार्गाचं उद्घाटन उद्या नागपूरच्या मनसर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार.

देवेंद्र फडणवीस

परभणीत **10** डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ असलेल्या प्रतिकात्मक संविधानाची तोडफोड केल्यामुळे प्रत्युत्तरात करण्यात आलेल्या आंदोलनात काही आंदोलक हिंस्त्र झाले. पोलिसांना शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक कारवाही करावी लागली असं फडणवीस म्हणाले. परभणीतील हिंसाचार आणि बीड मधील मस्साजोग येथील सरपंचाची निर्घृण हत्या यांवर काल विधानसभा सदस्यांनी प्रश्न उभं केले. आज सकाळच्या सत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर निवेदन सादर केलं. ११ डिसेम्बरला झालेलं आंदोलन हे शांतता पूर्ण होतं मात्र काही ठिकाणी जाळपोळ, तोडफोडीच्या घटना घडल्या. काही आंदोलक महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयात तोडफोड केली. या सर्वांत ५१ लोकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्यापैकी ४३ पुरुषांवर गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र ही कारवाई कोणताही आकस ठेवून करण्यात आलेली नाही असं फडणवीस म्हणाले.

*ही कुठेही हिंदू विरुद्ध दलित अशा प्रकारची दंगल नाही आणि  हे जे काही संविधान भारताच आहे, हे आपल्या सगळ्यांच आहे. यामुळे संविधानाचा अपमान करणारा  कुठल्या जातीचा, धर्माचा, पंताचा असेल त्याच्या जाती धर्म पंताकडे न पाहता त्याच्यावर जी काही कडक कारवाई  करता येईल ती केली पाहिजे, हे अत्यंत महत्त्वाच आहे. आणि म्हणून या संदर्भात ही कारवाई कुठल्याही जाती द्वेषातन तयार झालेली नाही. कुठल्याही कॉनस्परसीतून अशा प्रकारची  घटना घडली नाही तर एका  मनोरुग्नाणे अश्या प्रकारची घटना करून एक प्रकारे शहराचं स्वास्थ्य पूर्ण खराब केलेल आहे.*

या प्रकरणात अटकेत असलेले सोमनाथ सूर्यवंशी यांना श्वसनाचा दुर्धर आजार होता, असंही त्यांनी नमूद केलं. सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली. तसंच या घटनेनंतर मृत्यू झालेले आंबेडकरवादी कार्यकर्ते विजय वाकोडे यांनी या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असं सांगून त्यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत फडणवीस यांनी जाहीर केली. परभणीतल्या अप्रिय घटनेची, तसंच बीड जिल्हयात मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. तसंच विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या अंतर्गत विशेष तपास समिती स्थापन केली जाईल असं त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान अल्पकालीन चर्चेवर जितेंद्र आव्हाड यांनी राईट टू रिप्लाय अंतर्गत उत्तर मागितले असता अध्यक्षांनी ती नियमांतर्गत नाकारली. त्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला.

विधानसभा अन्य कामकाज

राज्य विधिमंडळाचा आज पाचवा दिवस आहे. सकाळी कामकाज सुरु झालं तेव्हा विधानसभेत आलेल्या तीन स्थगन प्रस्तावाच्या सूचना अध्यक्षांनी फेटाळल्या. मुंबईत काँग्रेसच्या कार्यालयावर झालेल्या हल्ल्याबाबत विजय वडेटीवार यांनी बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यांना सत्ताधारी बाकांवरून काँग्रेस विरोधी घोषणा देत विरोध केला गेला. काँग्रेसचे नाना पटोले आणि विजय वडेटीवार तसेच इतर सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो विधानसभेतील बैठक स्थानावर लावले. त्यावर

औचित्याच्या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लावण्याची परवानगी अध्यक्षांनी आम्हालाही द्यावी अशी मागणी केली. त्यावर नियमाप्रमाणे कुठल्याही नेत्याचे फोटो किंवा चित्र विधानसभेत झळकवण्यास मनाई असल्याचं विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केलं. यावर दोन्ही बाकावरून बाबासाहेब आंबेडकर यांच्या समर्थनार्थ घोषणा देत गदारोळ निर्माण झाल्यानं, अध्यक्षांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं. कल्याणमधे मराठी माणसाला मारहाण झाल्याचा मुद्दा विधानसभेत सुनील प्रभु यांनी उपस्थित केला होता. त्यावर मारहाण प्रकरणात दोषींवर तातडीनं कारवाई करण्यात येईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

विधान परिषद पुरवणी मागण्या

विधान परिषदेत आज सदस्यांनी विविध विषयांवर पुरवणी मागण्या प्रस्तुत केल्या. ऐकुया आमच्या प्रतिनिधीचा एक रिपोर्ट-

*राज्यातील पोलीस स्टेशनचे आधुनिकीकरण करून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उत्तम राहण्याची सोय होणे आणि पोलिसांसाठी धोरण आणणे आवश्यक असल्याचं मत सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केलं. याशिवाय ओबीसी मधील विविध पोटजातींच्या कल्याणासाठी संबंधित योजनांमध्ये सुधारणा करावी, पारधी समाजासाठी एक वेगळे महामंडळ तयार करावे, राज्याच्या क्रीडा धोरणात बदल करावा अशा मागण्या सदाभाऊ खोत यांनी सादर केल्या. तर पोलिसांचा गृह निर्माणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा आणि मुंबई तसंच पुणे इथं भटक्या विमुक्तांच्या विद्यार्थांसाठी चांगली वसतिगृहे निर्माण करावी अशी मागणी प्रवीण दरेकर यांनी सभागृहात केली. शाळेतील विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश मिळावा यासाठी केंद्रीकृत पद्धत रद्द करुन शाळास्तरावर गणवेश देण्याचे अधिकार द्यावे अशी मागणी आमदार मनीषा कायंदे यांनी विधानपरिषदेत केली. त्याचप्रमाणे राज्यातल्या शाळांना देण्यात येणाऱ्या टप्पा अनुदानाकरता ९२६ कोटींची तरतूद करण्याची मागणी विक्रम काळे यांनी केली. शिक्षकांना जूनी पेन्शन योजना देण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार तात्काळ निर्णय घेण्यात यावा असही ते म्हणाले. याशिवाय आमदार प्रज्ञा सातव, सत्यजित तांबे, जयंत तासगावकर आदी*

*सदस्यांनी देखील कृषी, शिक्षण तसच पर्यटन क्षेत्रांबाबत विविध पुरवणी मागण्या सादर केल्या. महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक,**2024** आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यिकरण) विधेयक, **2024** ही विधेयक आज विधान परिषदेत संमत करण्यात आली. ही विधेयक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभागृहात मांडली.*

नाना पटोले

गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याने देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल भाजपच्या मनात किती राग आहे ते उघड झालं. हे सत्य दडवून ठेवण्यासाठी भाजपकडून राहुल गांधी यांच्या विरोधात कुभांड रचून फेक नॅरेटिव्ह पसरवले जात आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या प्रवेशद्वारावर धक्काबुक्की केल्याचा कोणताही व्हिडिओ नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सत्ताधारी भाजप संसदेत चर्चा होऊ देत नाही. भारत जोडो यात्रेत नक्षलवादी विचारांच्या संघटना होत्या या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानावर देखील त्यांनी टीका केली. भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या त्या अर्बन नक्षली संघटनांची आणि त्या संघटनेच्या प्रमुखांची यादी द्यावी, अशी मागणी पटोले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून देखील केली आहे. भाजपच्या कथित कार्यकर्त्यांनी मुंबई काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केल्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेससह महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवन परिसरात आज जोरदार घोषणाबाजी करत भाजपच्या नीतींचा निषेध केला.

संसद-नवी दिल्ली

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज लोकसभेत गदारोळ केला. त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना नियमांचं पालन करण्याचं आणि संसद भवनाच्या प्रवेशद्वारावर

आंदोलन न करण्याचं आवाहन केलं. या निर्देशांचं पालन झालं नाही तर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. संसदेचं पावित्र्य कायम राखणं ही सर्व सदस्यांची संयुक्त जबाबदारी असल्याची जाणीव त्यांनी सर्व सदस्यांना करुन दिली. त्यानंतर गोंधळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी मांडला. या समितीमध्ये लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ सदस्य आहेत. भाजपचे अनुराग ठाकूर, परषोत्तम रुपाला, कॉंग्रेसचे प्रियंका गांधी, मनीष तिवारी, तृणमूल कॉंग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांच्यासह सुप्रिया सुळे देखील या समितीच्या सदस्य आहेत. यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा ओम बिर्ला यांनी केली. राज्यसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दोन्ही बाजूच्या सदस्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आणि जनतेच्या विश्वासाचा सन्मान करण्याचं आवाहन केलं. पण गोंधळ सुरू राहिल्यानं त्यांनी सुरुवातीला कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर गोंधळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करत असल्याची घोषणा अध्यक्ष धनखड यांनी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

शिवसेना ही एका परिवाराप्रमाणे असून पक्षात कुणीही नाराज नाही असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. एखादे पद मिळाले नाही तर माणूस म्हणून वाईट वाटणे साहजिक आहे, काहीजणांनी आपल्या भावना उघडपणे व्यक्त केल्या, मात्र याचा अर्थ कुणी नाराज आहे असे नाही. आज नाराजी व्यक्त केलेले तिन्ही आमदार माझ्या सोबत असून त्यांच्यापैकी कुणीही नाराज नाही. यापुढेही सगळेजण मिळून शिवसेनेमध्ये एकत्र राहून पक्षवाढीसाठी काम करणार असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली. आज विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान पत्रकार परिषद घेऊन शिंदे यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

बायो बिटूमेन

भारतातील पहिल्या बायो बिट्टूमेन या जैविक रसायनावर आधारित राष्ट्रीय महामार्गाचं उद्घाटन उद्या केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरातील मनसर इथं होणार आहे. पिकांच्या अवशेषांपासून बनवलेल्या बिट्टूमेनचा वापर करून एनएच ४४ ग्रामीण- मनसर, नागपूर बायपास हा महामार्ग बनवला गेला आहे. हा याप्रकारचा देशातील पहिला राष्ट्रीय महामार्ग आहे. भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे पिकांसोबतच त्यांचे अवशेष देखील मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतात. ते जाळल्यामुळे पर्यावरणाचं नुकसान होतं. त्याचप्रमाणे भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर बिटूमेन आयात करत. ते  टाळण्यासाठी सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिटट्यूट नवी दिल्ली आणि एका खाजगी कंपनीने मिळून या पिकांच्या अवशेषापासून बायो बिट्टूमेन तयार केलं आहे ज्याचा उपयोग रस्ते बांधणीत होणार आहे.

******